दैनिक

अदिती एक्सप्रेस

दि. ७ फेब्रुवारी २०२६
शनिवार
वर्ष ४ थे
अंक ९६
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**

आजचे पंचाग

- दिनांक : ७ फेब्रुवारी २०२६
- वार : शनिवार
- माह (अमावस्यांत) : माघ
- माह (पूर्णिमांत) : फाल्गुन
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : कृष्ण पक्ष
- तिथी : पंचमी तिथी (७ फेब्रुवारी रात्री ०१:१८ पर्यंत) त्यानंतर षष्ठी ि तथी
- नक्षत्र : हस्त नक्षत्र (७ फेब्रुवारी रात्री १२:२३ पर्यंत) त्यानंतर चित्रा नक्षत्र
- योग : धृति योग (रात्री ११:३६ पर्यंत) त्यानंतर शूल योग
- करण : कौलव करण (दुपारी १२:४५ पर्यंत) त्यानंतर तैतुला करण
- चंद्र राशी : कन्या राशी
- सूर्य राशी : मकर राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : सकाळी ११:२८ ते दुपारी १२:५३ पर्यंत
- शुभ मुहूर्त:
- अभिजित : दुपारी १२:३० ते दुपारी ०१:१५
- सूर्योदय : सकाळी ०७:१२
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:३३
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

महाराष्ट्रातील ७ राज्यसभा जागांची निवडणूक 'बिनविरोध' होणार?

शरद पवारांच्या जागेवरही टांगती तलवार


मुंबई : महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या दणदणीत विजयाचा फायदा आता महायुतीला राज्यसभेतही मिळणार आहे. येत्या एप्रिल महिन्यात राज्यातील ७ राज्यसभा खासदारांचा कार्यकाळ संपत असून, विधानसभेतील नव्या संख्याबळानुसार महायुतीचे पारडे जड झाले आहे. भाजपचे सर्वाधिक १३७ आमदार निवडून आल्याने भाजपच्या वाट्याला ४ जागा, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला १ जागा मिळण्याची दाट शक्यता आहे. दुसरीकडे, विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाचा मोठा फटका महाविकास आघाडीला बसणार आहे. यापूर्वी महाविकास आघाडीच्या ताब्यात असलेल्या ३ जागा आता महायुतीच्या खात्यात जाण्याची चिन्हे आहेत. मविआतील प्रमुख पक्षांचे संख्याबळ कमी झाल्याने त्यांना ७ पैकी केवळ १ जागेवर समाधान मानावे लागू शकते. विशेष म्हणजे, कार्यकाळ संपणाऱ्या खासदारांमध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार यांचाही समावेश असल्याने, त्यांच्या जागेवर आता कोणाची वर्णी लागते किंवा मविआ आपली एकमेव जागा कोणाला देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्यसभेसाठी आवश्यक असलेला **(पान २ वर)**



अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण थांबवा! मुख्यमंत्र्यांनी सत्ताधारी आणि विरोधकांना सुनावले

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघाती निधनानंतर सुरू झालेल्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, याबाबत सुरू असलेले राजकारण तात्काळ थांबवावे, असा इशारा त्यांनी दिला आहे. हा वाद निरर्थक, चुकीचा आणि खालच्या पातळीचा असल्याचे सांगत, सत्ताधारी आणि विरोधक अशा दोन्ही बाजूंना त्यांनी खडेबोल सुनावले.

अजित पवार यांच्या निधनानंतर काही घटकांकडून विविध तर्कवितर्क मांडले जात असून, या दु:खद घटनेतून राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. जनतेत लोकप्रिय असलेले आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अचानक आपल्यातून निघून गेल्यानंतर अशा प्रकारचे राजकारण करणे अत्यंत चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक जण या घटनेला स्वत:च्या राजकीय चष्म्यातून पाहण्याचा प्रयत्न करत असून, ही मानसिकता धोकादायक असल्याचेही त्यांनी नमूद केले.



मुंबईहून बारामतीकडे प्रचारसभेसाठी रवाना झाले असताना अजित पवार यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला होता. या घटनेनंतर काही तासांतच सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्याने नव्या चर्चांना तोंड फुटले. मात्र, या सर्व घडामोडींना अनावश्यक राजकीय रंग देणे अयोग्य असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. अशा दु:खद प्रसंगी संयम राखणे, संवेदनशीलता दाखवणे आणि कुटुंबीयांच्या भावनांचा आदर करणे हीच अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

'महिंद्रा'ची १५ हजार कोटींची गुंतवणूक

विदर्भाला औद्योगिक केंद्र म्हणून विकसित करण्याच्या राज्य सरकारच्या प्रयत्नांबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडच्या १५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे स्वागत केले. 'अॅडव्हांटेज विदर्भ' कार्यक्रमात या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची घोषणा करण्यात आली असून, नागपूरमध्ये १ हजार ५०० एकर क्षेत्रावर देशातील सर्वात मोठा एकात्मिक वाहन आणि ट्रॅक्टर उत्पादन प्रकल्प उभारला जाणार आहे. तसेच, संभाजीनगर **(पान २ वर)**

मेघालयमध्ये अवैध कोळसा खाणीत भीषण स्फोट, १८ जणांचा बळी, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता

शिलाँग : मेघालयातील जयंतिया हिल्स जिल्ह्यातील थांगस्कू परिसरात एका अवैध कोळसा खाणीत झालेल्या भीषण स्फोटाने मोठी खळबळ उडाली आहे. या दुर्दैवी घटनेत आतापर्यंत १८ कामगारांचा मृत्यू झाला असून, अद्यापही काही लोक ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. पोलीस महासंचालक आई नोंगरंग यांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत १६ मृतदेह बाहेर काढण्यात यश आले आहे. ही घटना घडली तेव्हा खाणीत नेमके किती कामगार कार्यरत होते, याची निश्चित माहिती अद्याप मिळालेली नाही. मात्र, स्फोटाची तीव्रता इतकी मोठी होती की कामगारांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केले असून, मृतांच्या नातेवाईकांसाठी प्रत्येकी २ लाख रुपयांची सानुग्रह मदत जाहीर केली आहे. सध्या स्थानिक प्रशासन आणि बचाव पथकांकडून युद्धपातळीवर शोधमोहीम राबवली जात आहे. मेघालयातील अवैध खाणकामाचा प्रश्न या निमित्ताने पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



मेघालयातील पूर्व जयंतिया हिल्समध्ये झालेल्या भीषण कोळसा खाण दुर्घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधान कार्यालयाने सोशल मीडियाद्वारे मोदींचा संदेश शेअर केला असून, या दुर्घटनेत प्राण गमावलेल्यांच्या कुटुंबीयांप्रति त्यांनी संवेदना व्यक्त केल्या आहेत. तसेच, या घटनेतील जखमींनी लवकरात लवकर बरे व्हावे, अशी प्रार्थनाही पंतप्रधानांनी केली आहे. या दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना 'पंतप्रधान राष्ट्रीय मदतनिधी'तून २ लाख रुपये, तर गंभीर जखमींना **(पान २ वर)**

'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमात सांगलीच्या मातीचा, महाराष्ट्राच्या लेकराचा गौरव; मुख्यमंत्र्यांनी केले कौतुक

मुंबई: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज म्हणजेच शुक्रवार ६ फेब्रुवारी रोजी 'परीक्षा पे चर्चा' च्या निमित्ताने विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आलेल्या विद्यार्थ्यांचे आसामी 'गमोसा' देऊन स्वागत केले.



पुढील काही दिवसांमध्ये देशभरातील विविध राज्यातील बोर्डाच्या परीक्षा सुरू होणार आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही निवडक विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आज या कार्यक्रमाशी ४.५० कोटीहून अधिक विद्यार्थी, पालक आणि शिक्षक जोडले गेले आहेत.

परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील १० वीचा विद्यार्थी प्रणव भोसलेची निवड झाली. याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केले आहे. 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमात सांगलीच्या मातीचा, महाराष्ट्राच्या लेकराचा गौरव झाल्याची भावना मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

काय म्हणाले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'परीक्षा पे चर्चा २०२६' साठी देशभरातील तब्बल ४.५ कोटी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. **(पान २ वर)**

वांद्रेवरळी सी लिंक आणि कोस्टल रोडवर हेलिपॅड उभारा

मुंबई : पुणेमुंबई द्रुतगती मार्गावर दोन दिवसांपूर्वी गॅस टँकर उलटून गंभीर आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली होती. या घटनेमुळे तब्बल ३६ तासांहून अधिक काळ प्रवासी अडकून पडले होते. या पार्श्वभूमीवर भविष्यातील संभाव्य धोके लक्षात घेता वांद्रेवरळी सी लिंक, वर्सोवावांद्रेवरळी सी लिंक तसेच संपूर्ण कोस्टल रोडवरील आपत्कालीन व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे याठिकाणी हेलिपॅड उभारावे, अशी मागणी मुंबई उपनगरचे पालकमंत्री आशिष शेलार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

या महत्त्वाच्या वाहतूक मार्गांवर अपघात, आग किंवा नैसर्गिक आपत्ती घडल्यास तातडीने आणि प्रभावी प्रतिसाद देणे मोठे आव्हान ठरू शकते. विशेषत: कोस्टल रोड हा काही ठिकाणी भुयारी तर काही ठिकाणी समुद्रावरून जाणारा मार्ग असल्याने जखमींना त्वरित रुग्णालयात हलवणे, सुरक्षा यंत्रणांची जलद हालचाल सुनिश्चित करणे तसेच आपत्कालीन सेवा वेळेत **(पान २ वर)**

राज्यातील ९ महानगरपालिकांना मिळाले महापौर

मुंबई: राज्यातील विविध महानगरपालिकांमध्ये आज महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत भाजप-महायुतीने स्पष्ट आघाडी घेतल्याचे चित्र दिसून आले. जळगाव, धुळे, कोल्हापूर, पिंपरी-चिंचवड, नागपूर, अमरावती, सोलापूर, नाशिक आणि अहिल्यानगर या महत्त्वाच्या महानगरपालिकांमध्ये महापौर निवडी पूर्ण झाल्या असून काही ठिकाणी चुरशीच्या वाटणाऱ्या लढती अखेर बिनविरोध झाल्या, तर काही ठिकाणी भाजपने मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला.

सोलापूर महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपचे विनायक कोंड्याल यांची बिनविरोध निवड झाली. शिवसेना आणि एमआयएमच्या उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतल्याने कोंड्याल यांचा मार्ग मोकळा झाला. जळगाव महानगरपालिकेत भाजपच्या दीपमाला काळे यांची महापौरपदी निवड झाली असून शिवसेनेच्या मनोज चौधरी यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली आहे. दीपमाला काळे यांनी जळगाव महापालिकेच्या १७व्या महापौर म्हणून पदभार स्वीकारला.

नागपूर महानगरपालिकेत भाजपच्या नीता ठाकरे यांनी १०४ मते मिळवत काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव केला. तर धुळे महानगरपालिकेत तिरंगी लढत झाली. या निवडणुकीत भाजपच्या मायादेवी परदेशी यांनी ५० मते मिळवून महापौरपदावर विजय मिळवला. राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिवसेनेच्या संयुक्त उमेदवाराला केवळ १३ मते मिळाली. दुसरीकडे, नांदेड महानगरपालिकेत प्रथमच भाजपचा महापौर निवडून आला आहे. ८१ पैकी ४५ जागा जिंकून भाजपने स्पष्ट बहुमत मिळवले असून महापौरपदासाठी कविता मुळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. **(पान २ वर)**

सिक्कीममध्ये जाणवले चक्क १३ भूकंपाचे धक्के

सिक्कीम: सिक्कीमच्या काही भागात चक्क १३ भूकंपाचे धक्के जाणवले. गुरुवारी रात्री उशिरा ते शुक्रवार सकाळपर्यंत हे धक्के जाणवले. राज्यातील सहा जिल्ह्यांपैकी चार जिल्ह्यांमध्ये या भूकंपाची नोंद झाली आहे. मंगन, नामची, गंगटोक आणि गेजिंग या जिल्ह्यांमध्ये हे धक्के जाणवले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार या भूकंपांची तीव्रता रिश्टर स्केलवर २.२ ते ४.५ पर्यंत होती.

या भूकंपामुळे लोक भीतीने घराबाहेर पडले आणि परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.अनेक रहिवासी काही मिनिटे घरा बाहेरच थांबले. त्यांना भूकंपाच्या संभाव्य धक्क्यांची भीती वाटत होती.

भारत सरकारच्या भूगर्भ विज्ञान मंत्रालयाच्या राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या आकडेवारीनुसार, नामची जिल्ह्यात चार आणि गंगटोक आणि गेजिंग जिल्ह्यात प्रत्येकी एक भूकंप जाणवला. गुरुवारी रात्री १:०९ वाजता गेझिंग जिल्ह्यात भूकंपाचा पहिला धक्का जाणवला, तर शुक्रवारी पहाटे ५:२९ वाजता नामची जिल्ह्यात शेवटचा धक्का जाणवला.

तर गेझिंग जिल्ह्यात पहाटे १:०९ वाजता पहिला धक्का जाणवला, ज्याची तीव्रता रिश्टर स्केलवर **(पान २ वर)**

लातूर जिल्ह्यात १ हजार ७४७ केंद्रांवर शनिवारी मतदान; प्रशासनाची तयारी पूर्ण

मतदान पथके रवाना; ८ हजार ४१४ अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश



दै. अदिती एक्सप्रेस

लातूर, : राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत येणाऱ्या लातूर, औसा, रेणापूर, चाकूर, अहमदपूर, उदगीर, जळकोट, निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी या १० पंचायत समित्यांचा सार्वत्रिक निवडणुकीसाठी शनिवार, ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वा. दरम्यान मतदान होणार आहे. यासाठी प्रशासन सज्ज झाले असून सर्व मतदान पथके आज संबंधित तालुका स्तरावरून रवाना झाली. तसेच चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने आवश्यक सज्जता केली आहे. जिल्ह्यात एकूण ५९ जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी २४२ उमेदवार निवडणूक रिंगणात असून १० पंचायत समित्यांच्या ११८ गणांम ध्ये ४१९ उमेदवार निवडणूक लढवीत आहेत. जिल्ह्यात एकूण १४ लाख ९१ हजार १४९ म तदार असून, यामध्ये ७ लाख ८२ हजार ५१४ पुरुष आणि ७ लाख ८ हजार ६२२ महिला व १३ इतर मतदारांचा समावेश आहे. जिल्ह्यात एकूण १ हजार ७४७ मतदान केंद्रांवर मतदान होणार असून यासाठी १ हजार ७४७ मतदान पथके स्थापन करण्यात आली आहेत. यामध्ये एकूण ८ हजार ४१४ अधिकारी, कर्मचारी यांचा समावेश राहणार आहे. सर्व केंद्रांवर रॅम्प, व्हीलचेअर, पिण्याचे पाणी, शेड आणि **(पान २ वर)**

तोफा थंडावल्या; जि.प. रणनीती तापली

लातूर : तब्बल नऊ वर्षांनी होत असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठीच्या प्रचाराच्या तोफा गुरुवारी रात्री थंडावल्या. राजकीय पक्षांनी एकमेकांवर धारदार वार करीत घेरण्याचा प्रयत्न केला. प्रचार थांबला असला तरी रणनीती तापलेलीच आहे. जिल्हा परिषदेच्या ५९ गटांसाठी २४२ उमेदवार आखाड्यात आहेत.

पंचायत समितीच्या ११८ गणांसाठी ४१९ उमेदवार आपले नशीब अजमावीत आहेत. गट आणि गणांच्या रिंगणात एकूण ६६१ उमेदवार असून आता त्यांचे राजकीय नशीब मतदारांच्या हाती आहे. ही निवडणूक पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. १ हजार ७४७मतदान केंद्रांवर ८,४१४ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कडक पोलिस बंदोबस्त तैनात आहे. शुक्रवारी प्रचाराला बंदी असली तरी गुप्त बैठका आणि रणनीतीवर भर राहणार आहे. शनिवारी उमेदवार आणि प्रशासनाची खरी परीक्षा असणार आहे.

मशिदीत नमाज सुरु असताना स्फोट, १२ ठार; इस्लामाबादमध्ये आणीबाणी घोषित



इस्लामाबाद: पाकिस्तानची राजधानी असलेल्या इस्लामाबादमधील एका इमामबारगाहमध्ये भीषण स्फोट झाला. या स्फोटात आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला असून ३० जण गंभीर जखमी झाले आहेत. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इस्लामाबादमध्ये आणीबाणी घोषित करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इस्लामाबादमधील एका शिया मशिदीत हा आत्मघातकी हल्ला झाला आहे. आत्मघातकी हल्लेखोराने आत प्रवेश केल्यानंतर गेटजवळ स्वत:ला उडवून दिले. यामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आहे आणि चार जण जखमी झाले आहेत. तर मीडिया रिपोर्ट्सनुसार आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला आहे. स्फोटाचे वृत्त मिळताच पोलिस आणि बचाव पथके घटनास्थळी पोहोचली आणि प्राथमिक बचाव कार्य सुरू झाले आहे.

स्फोटानंतर, इस्लामाबादमधील पॉलीक्लिनिक, पाकिस्तान इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (पीआयएमएस) आणि सीडीए हॉस्पिटलमध्ये आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे. रुग्णालयाच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार; पिआयएमएसच्या कार्यकारी संचालक (ईडी) यांच्या सूचनेनुसार रुग्णालयात आणीबाणी लागू करण्यात आली आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, मुख्य आपत्कालीन, ऑर्थोपेडिक, बर्न सेंटर आणि न्यूरोलॉजी विभाग सक्रिय करण्यात आले आहेत. जखमींना पिआयएमएस आणि पॉलीक्लिनिकमध्ये दाखल करण्यात येत आहे.

आडवा टँकर

१७ टन ज्वालाग्रही वायू कोचीहून गुजरातला घेऊन जाणाऱ्या या टँकरला मार्गात आणखी शंभर प्रकारच्या अडचणी येऊ शकल्या असत्या. सामान्यांच्या जीवाला त्यातून असंख्य धोके उद्भवू शकले असते. अशा टँकरला रस्त्यावरून प्रवास करताना खबरदारी घेण्याची काही अट आहे की नाही?

आधी 'इंडिगो' आणि आता मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघाती कोंडीने पायाभूत सुविधा खासगी संस्थांच्या हाती किती प्रमाणात द्याव्यात, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. खासगीकरणानंतरच्या या सेवांच्या कार्यक्षमतेचं गुलाबी चित्र रंगवताना बहुतांश वेळा पाश्चिमात्य देशातील खासगी सेवांचा दाखला दिला जातो. तो पूर्णांशाने नसला, तरी काही प्रमाणात खरा असतो. त्याला कारण आहे, तिथले नागरिक आणि ग्राहक हक्क, विमा कंपन्यांचा विस्तार आणि गरज पडल्यास त्यांचे कान धरण्यासाठी तत्पर न्यायव्यवस्था आहे. आपल्याकडे यातलं काहीच नाही. तरीही वेगाने खासगीकरण; काही क्षेत्रात तर मक्तेदारीकरण सुरू आहे. अगदी सुरुवातीलाच असे अनेक धक्के बसले आणि धोके स्पष्ट दिसत असले, तरी देशात कोणीच जागं व्हायला तयार नाही, असं दुर्दैवाने दिसतं आहे.

विविध क्षेत्रांतील खासगीकरणाचा टक्का वाढवताना त्या प्रमाणात नियंत्रक यंत्रणांना सक्षम आणि प्रभावी करणं आवश्यक आहे. आधी 'इंडिगो' आणि त्यानंतर मुंबई – पुण्यादरम्यानची वाहतूक कोंडी, नवी मुंबईतील नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर होत असलेली मोबाईल नेटवर्कची अडचण, खासगी बसचे देशभर सुरू असलेले भयानक अपघात... या मालिकेत भर टाकण्यासाठी आणखी कितीतरी दुर्घटना आहेत. पण, यातल्या कुठल्या घटनेने संबंधित क्षेत्राची नियंत्रण यंत्रणा बळकट केली गेली? असा प्रश्न विचारला, तर त्याचं उत्तर देण्यासाठी मुद्दलात काहीही नाही! कफ सिरप प्रकरणातील एका बालकाचा २२८ दिवस झुंजल्यानंतर परवाच मृत्यू झाला. इतके बळी जाऊनही या प्रकरणात ज्या यंत्रणांनी डोळेझाक केली, त्यातल्या किती यंत्रणांवर कारवाई झाली? या यंत्रणांच्या नेहमीच्या निष्काळजीपणाला लोक आता सरावले आहेत. त्याबद्दल त्यांची तक्रार नाही. पण, जेव्हा अशा भयंकर दुर्घटना घडतात, तेव्हा त्याचं निमित्त करून तरी या यंत्रणांना; गलेलठ्ठ पगार आणि इतर कमाई करणाऱ्या त्यांच्या अधिकाऱ्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करा, एवढीच जनतेची माफक अपेक्षा आहे. मुंबई – पुणे वाहतूक कोंडीसाठी जबाबदार कोण? हेच अजून स्पष्ट होत नाही, यासारखं दुर्दैव नाही.

पायाभूत सेवांचा वेगाने विस्तार होतो आहे, ही चांगलीच गोष्ट आहे. नवनवे प्रकल्प आखले जात आहेत, त्यांची भूमिपूजनं होत आहेत, त्यासाठी निधीच्या भरीव तरतुदी जाहीर होत आहेत, परदेशी गुंतवणुकीचा वाटाही वाढतो आहे, या सगळ्या कामगिरीबाबत समाधान म्हणूनच राज्यातल्या महायुती सरकारवर महाराष्ट्रातला मतदार पुनः पुन्हा विश्वास व्यक्त करतो आहे, महायुतीला निर्विवाद कौल देतो आहे. विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या या वेगामुळेच बहुसंख्य जनता केंद्रातल्या आणि राज्यातल्या सरकारची समर्थक झाली आहे. धोरणकर्ते देशाला नवनवीन स्वप्नं दाखवून त्याच्या अंमलबजावणीचे साक्षात्कार घडवत असताना या प्रकल्पांच्या दुरुस्ती, देखभालीची जबाबदारी असणाऱ्या यंत्रणा जर गहाळ राहणार असतील, तर त्याचं खापर विनाकारण राजकीय नेतृत्वावरच फुटण्याची शक्यता आहे. त्यामुळे, राज्यातल्या सरकारने असे प्रसंग विशेष गांभीर्याने घेऊन असल्या निष्काळजी, गाफीलपणाची जबाबदारी शक्य तितक्या लवकर निश्चित करून संबंधितांवर कारवाई केली पाहिजे आणि ते लोकांच्या निदर्शनासही आलं पाहिजे. मुंबई – पुणे महामार्ग हा देशातील बहुचर्चित द्रुतगती महामार्ग आहे.

हा महामार्ग मुंबई आणि पुणे या देशातल्या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडतोच; पण मुंबईचा दक्षिण भाराताशी भूपृष्ठावरून संपर्क याच रस्त्याने होतो. रोज सरासरी ५० हजार वाहनं या महामार्गावरून प्रवास करतात. या ५० हजारांत छोट्या चारचाकी गाड्यांपासून मल्टी ॲक्सेल महाकाय मालट्रकचाही समावेश असतो. २५ वर्षांपेक्षा अधिक काळ या महामार्गाची टोल वसुली एकाच कंपनीकडे आहे. ही कंपनी आता देशभर या स्वरूपाची आणखीही काम करते आहे. इतका अनुभव गाठीशी असल्यानंतर या महामार्गावरून कोणकोणत्या प्रकारची वाहतूक होते, त्यात काय जोखीम आहे, आपत्ती व्यवस्थापनाचे कोणते प्रश्न त्यातून निर्माण होऊ शकतात, याची माहिती या कंपनीकडे असायलाच हवी. हा महामार्ग ज्या सरकारी उपक्रमाच्या मालकीचा आहे, ते राज्य रस्ते विकास महामंडळ याबाबत अधिक जागरूक असायला हवं. दुर्घटना घडून २४ तास उलटून गेल्यानंतर आपल्या हालचालींची माहिती चार-पाचच काय, देशातल्या सगळ्या भाषांत दिली, तरी या महामंडळाची कार्यक्षमता त्याने पटवून देता येणार नाही! प्रोपेनसारखा १७ टन ज्वालाग्रही वायू कोचीहून गुजरातला घेऊन जाणाऱ्या या टँकरला मार्गात आणखी शंभर प्रकारच्या अडचणी येऊ शकल्या असत्या. सामान्यांच्या जीवाला त्यातून असंख्य धोके उद्भवू शकले असते. अशा टँकरला रस्त्यावरून प्रवास करताना खबरदारी घेण्याची काही अट आहे की नाही? या संदर्भातल्या मार्गदर्शक सूचना केवळ कागदांवर, फायलीत गुंडाळून ठेवण्यासाठीच आहेत का? रस्त्यात आडव्या झालेल्या या टँकरमुळे २०-२२ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. अनेकांच्या आयुष्याची खोटी झाली. मालाचं प्रचंड नुकसान झालं. महानगरांची जीवनावश्यक पुरवठ्याची साखळी तुटली. ध्यानीमनी नसताना रस्त्यात अडकलेल्यांची अक्षरशः दैना झाली. याची नुकसानभरपाई कोणी कोणाला द्यायची? ज्यांनी अपघाताची कल्पना देऊन वेळीच वाहतूक रोखली नाही, त्यांच्या बेजबाबदारपणाची शिक्षा काय ठरवायची? निदान मुंबई, पुण्यातल्या जनतेला तरी आज हेच प्रश्न छळत आहेत. त्यांची उत्तरं जितक्या लवकर मिळतील, तेवढं बरं.

रमाबाई आंबेडकरांचे सामाजिक परिवर्तनाच्या पायाभरणीतील योगदान : डॉ. राजेंद्र बगाटे

७ फेब्रुवारी हा दिवस भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत अर्थपूर्ण, संवेदनशील आणि प्रेरणादायी ठरतो. हा दिवस म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनसाथी, त्यागमूर्ती, संघर्षशील आणि मौनात राहूनही सामाजिक क्रांतीची मशाल पेटती ठेवणाऱ्या रमाबाई भिमराव आंबेडकर यांचा जयंती दिन होय. भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय विषमता, सामाजिक अन्याय, स्त्रीदमन, आर्थिक दारिद्र्य आणि मानसिक गुलामगिरीच्या पार्श्वभूमीवर रमाबाईंचे जीवन केवळ एका महापुरुषाच्या पत्नीचे जीवन नव्हते. ते जीवन एका स्वतंत्र सामाजिक योद्ध्याचे, अपार सहनशीलतेचे, निःस्वार्थ त्यागाचे आणि मौनातून घडलेल्या क्रांतीचे जिवंत प्रतीक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक, शैक्षणिक आणि राजकीय संघर्षामागे रमाबाईंच्या कष्टांची, वेदनांची आणि शांत पाठबळाची भक्कम भिंत उभी होती, हे वास्तव समजून घेतल्याशिवाय आंबेडकरी चळवळीचे संपूर्ण चित्र स्पष्ट होत नाही.

रमाबाई आंबेडकर यांचा जन्म अत्यंत साध्या, उपेक्षित आणि सामाजिकदृष्ट्या वंचित परिस्थितीत झाला. त्या काळातील दलित समाजाचे जीवन म्हणजे अपमान, अस्पृश्यता, दारिद्र्य, बहिष्कार आणि सततची असुरक्षितता यांचा संगम होता. स्त्री म्हणून जन्माला येणे म्हणजे दुहेरी अन्याय सहन करणे, हीच त्या समाजाची वास्तवता होती. शिक्षण, स्वातंत्र्य, निर्णयक्षमता, आरोग्य आणि आत्मसन्मान या मूलभूत हक्कांपासून स्त्रीला वंचित ठेवणारी सामाजिक रचना रमाबाईंच्या आयुष्यावरही खोलवर परिणाम करत होती. बालपणापासूनच कष्ट, काम, जबाबदाऱ्या आणि मौनातील सहनशीलता हेच त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग बनले. लहान वयातच जीवनातील कठोर वास्तव स्वीकारावे लागल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व संयमी, सहनशील आणि आत्मसंयमी बनले.

अत्यंत लहान वयात रमाबाईंचा विवाह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झाला. हा विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील कौटुंबिक नाते नव्हते, तर तो एका व्यापक सामाजिक संघर्षाचा प्रारंभ होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आयुष्य शिक्षण, विचार, आंदोलन, संघर्ष आणि सामाजिक विरोधाने भरलेले होते. या संघर्षांचा भार रमाबाईंनाही समानतेने पेलावा लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणासाठी, नोकरीसाठी आणि समाजसुधारणेसाठी सातत्याने व्यग्र असताना रमाबाई घर, कुटुंब, मुले आणि सामाजिक वास्तव यांचा समतोल राखत होत्या. संसार सांभाळताना त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ध्येयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले नाही, उलट त्या ध्येयांवर त्यांनी अढळ विश्वास ठेवला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षण भारताबाहेर सुरू असताना रमाबाईंवर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी येऊन पडली. आर्थिक टंचाई, अन्न-वस्त्राचा अभाव, आजारपण, सामाजिक उपेक्षा आणि मानसिक ताण हे त्यांचे रोजचे वास्तव होते. अनेक वेळा उपाशीपोटी दिवस काढावे लागले, साध्या वस्त्रांवर समाधान मानावे लागले. तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, हीच त्यांची ठाम भूमिका होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचनी मिळवलेले ज्ञान हे केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नसून संपूर्ण समाजाच्या मुक्तीसाठी आहे, याची रमाबाईंना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या वेदनांवर मौन धारण करून सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाला बळ दिले.

रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील सर्वांत वेदनादायी आणि हृदयद्रावक अध्याय म्हणजे त्यांच्या मुलांचे अकाली निधन होय. मातृत्वाचा आनंद अनुभवण्याआधीच त्यांना असह्य दुःख सहन करावे लागले. एका मागोमाग एक अपत्य गमावणे ही कोणत्याही आईसाठी अकल्पनीय वेदना असते. रमाबाईंच्या आयुष्यात ही वेदना वारंवार आली. तरीही त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर त्याचा परिणाम होऊ दिला नाही. स्वतःच्या दुःखाला बाजूला ठेवून समाजासाठी झटणाऱ्या पतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, हेच त्यांनी आपले जीवनधर्म मानले. रमाबाईंचा हा त्याग भारतीय स्त्रीच्या सहनशीलतेचा, मानसिक बळाचा आणि निस्वार्थ प्रेमाचा सर्वोच्च नमुना आहे.

रमाबाई आंबेडकर या जरी प्रत्यक्ष सामाजिक आंदोलनांच्या मंचावर दिसत नसल्या, तरी त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे, मूलभूत आणि निर्णायक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना स्थैर्य देणारे, त्यांच्या संघर्षाला मानसिक आधार देणारे आणि त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कठीण काळात खंबीरपणे साथ देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे रमाबाई आंबेडकर होत्या. अस्पृश्यता निवारण, शिक्षणाचा प्रसार, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, धर्मांतर चळवळ आणि भारतीय संविधाननिर्मिती यांसारख्या ऐतिहासिक कार्यांसाठी बाबासाहेबांना जे मानसिक बळ आवश्यक होते, ते रमाबाईंच्या निस्वार्थ त्यागातून मिळाले.

रमाबाईंचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे, शांत, संयमी आणि आत्मसन्मानाने भरलेले होते. प्रसिद्धी, सन्मान, मान्यता किंवा सार्वजनिक गौरवाची अपेक्षा त्यांनी कधीच ठेवली नाही. समाजाने अनेकदा त्यांच्याकडे केवळ 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्नी' म्हणून पाहिले, परंतु प्रत्यक्षात त्या एका स्वतंत्र विचारसरणीच्या, मूल्यनिष्ठ आणि आत्मसन्मान जपणाऱ्या स्त्री होत्या. अपमान, दुर्लक्ष, अवहेलना आणि कष्ट सहन करूनही त्यांनी कधी तक्रार केली नाही. त्यांचे मौन हे कमजोरीचे नव्हे, तर अंतर्गत शक्तीचे, संयमाचे आणि आत्मविश्वासाचे प्रतीक होते.

भारतीय समाजातील स्त्री-पुरुष समानतेच्या चर्चेत रमाबाई आंबेडकर यांचे जीवन अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यांनी स्त्रीवादावर भाषणे केली नाहीत, लेखन केले नाही, परंतु त्यांच्या जीवनाने स्त्रीच्या सामाजिक भूमिकेची नवी व्याख्या केली. शिक्षणापासून वंचित असूनही त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक ध्येयांना त्यांनी पूर्ण पाठिंबा दिला. त्यांच्या जीवनातून हे स्पष्ट होते की स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून ती सामाजिक परिवर्तनाची शांत पण प्रभावी वाहक असते.

रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील दारिद्र्य हे केवळ आर्थिक नव्हते, तर ते सामाजिक अन्यायाचे आणि संरचनात्मक विषमतेचे प्रतीक होते. जातीय भेदभाव, सामाजिक बहिष्कार, धार्मिक रूढी आणि स्त्री म्हणून दुय्यम स्थान या सगळ्यांचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर झाला. तरीही त्यांनी परिस्थितीला दोष देत बसण्याऐवजी आशेचा मार्ग स्वीकारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर, मूल्यांवर आणि ध्येयांवर ठेवलेला विश्वास हेच त्यांच्या जगण्याचे बळ होते. त्यांच्या जीवनातून हे अधोरेखित होते की सामाजिक परिवर्तनासाठी फक्त पुढे उभे राहणारे नेतेच नव्हे, तर मागे उभे राहून आधार देणारे व्यक्तिमत्त्वही तितकेच महत्त्वाचे असते.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन स्त्रीवादाचा अप्रत्यक्ष पण प्रभावी आधारस्तंभ आहे. त्यांनी शब्दांतून स्त्रीवाद मांडला नाही, परंतु त्यांच्या जीवनप्रवासाने स्त्रीच्या दुहेरी संघर्षाचे वास्तव जगासमोर ठेवले. जातीय अन्याय आणि पितृसत्ताक व्यवस्था या दोन्हींचा सामना करत त्यांनी आपले जीवन जगले. आजच्या स्त्री-अभ्यासात रमाबाईंच्या जीवनाकडे केवळ सहनशीलतेचे प्रतीक म्हणून नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत मोलाचे योगदान देणाऱ्या स्त्री म्हणून पाहिले जाणे आवश्यक आहे.

आजच्या काळात रमाबाई आंबेडकर यांचे स्मरण केवळ औपचारिक जयंतीपुरते मर्यादित राहू नये. त्यांच्या जीवनाचा अभ्यास करताना स्त्री-संघर्ष, दलित प्रश्न, कुटुंबातील त्याग, मानसिक सहनशीलता, भावनिक श्रम आणि सामाजिक परिवर्तनातील अदृश्य योगदान या सर्व पैलूंवर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. रमाबाईंच्या जीवनकथेचा समावेश शिक्षणक्रमात, सामाजिक चर्चेत, स्त्री-अभ्यासात आणि दलित साहित्याच्या अभ्यासात होणे ही काळाची गरज आहे.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन हे भारतीय समाजाच्या वास्तवाचे आरसेपण आहे. त्या समाजाच्या कडेला उभ्या राहिलेल्या, पण परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असलेल्या स्त्रीचे प्रतीक आहेत. त्यांनी कधीही स्वतःसाठी इतिहास लिहिला नाही, परंतु त्यांच्या त्यागाने इतिहास घडविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्यामागील अदृश्य शक्ती म्हणून रमाबाईंचे स्थान अढळ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना त्यांच्या मूल्यांना आत्मसात करणे, हेच त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य ठरेल.

रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ अभिवादन न करता त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आजच्या सामाजिक प्रश्नांकडे नव्या दृष्टीने पाहिले पाहिजे. स्त्री सक्षमीकरण, सामाजिक न्याय, मानवी मूल्यांची जोपासना, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या अंमलबजावणीसाठी रमाबाईंचे जीवन मार्गदर्शक ठरते. त्यांचे मौन आजही आपल्याशी बोलते, त्यांचा त्याग आजही समाजाला प्रश्न विचारतो आणि त्यांचे जीवन आजही परिवर्तनाची प्रेरणा देते. म्हणूनच रमाबाई भिमराव आंबेडकर या केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नाहीत, तर त्या वर्तमान आणि भविष्याला दिशा देणाऱ्या विचारांची अखंड साक्ष आहेत.

****

- डॉ. राजेंद्र बगाटे,

पान १ वरून

महाराष्ट्रातील ७...

३७.५ मतांचा कोटा पूर्ण करणे हे विरोधकांसाठी मोठे आव्हान ठरणार आहे.

राज्यातील एकूण १९ जागांपैकी ७ जागांचा कार्यकाळ येत्या २ एप्रिल रोजी संपणार आहे. यामध्ये महाविकास आघाडी आणि महायुतीतील अनेक बड्या चेहऱ्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) सर्वे सर्वा शरद पवार आणि त्यांच्या पक्षाच्या फौजिया खान या निवृत्त होत आहेत. ठाकरे गटाच्या आक्रमक नेत्या प्रियंका चतुर्वेदी यांचाही कार्यकाळ याच दिवशी पूर्ण होणार असून, काँग्रेसच्या रजनी पाटील यांचीही मुदत संपत आहे. दुसरीकडे, महायुतीमधील केंद्रीय मंत्री रामदास आठवले, माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड आणि भाजपचे धैर्यशील पाटील यांचीही खासदारकी २ एप्रिल रोजी संपणार आहे. विधानसभा निवडणुकीतील बदललेल्या संख्याबळामुळे या रिक्त होणाऱ्या जागांवर आता कोणाची वर्णी लागते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. सध्याच्या गणितानुसार, महायुतीला यातील बहुतांश जागांवर विजय मिळवणे सोपे असले तरी मविआ आपली एकमेव जागा राखण्यासाठी कोणाला रिंगणात उतरवते, याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

अजित पवारांच्या...

येथे १५० एकरांवर सप्लायर पार्क विकसित करण्यात येणार आहे. हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर दरवर्षी ५ लाखांहून अधिक वाहनांचे आणि १ लाख ट्रॅक्टरचे उत्पादन होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. या गुंतवणुकीमुळे रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा आणि प्रादेशिक विकासाला गती मिळेल तसेच वाहनउद्योग, शेती उपकरणे, तंत्रज्ञान आणि सप्लाय चेन क्षेत्राला चालना मिळेल. महाराष्ट्राला उत्पादन क्षेत्रात अग्रस्थानावर नेण्याच्या दृष्टीने ही गुंतवणूक महत्त्वाची ठरणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मेघालयमध्ये अवैध...

५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, पोलीस अधीक्षक विकास कुमार यांनी माहिती दिली की, एका गंभीर जखमी व्यक्तीवर प्राथमिक उपचार करून त्याला पुढील उपचारांसाठी राजधानी शिलाँग येथे हलवण्यात आले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ज्या ठिकाणी हा स्फोट झाला, ती खाण बेकायदेशीरपणे चालवली जात असल्याची प्राथमिक शक्यता पोलीस अधीक्षकांनी वर्तवली आहे. राष्ट्रीय हरित प्राधिकरणाने (NGT) २०१४ मध्येच मेघालयातील 'रेट होल' कोळसा खाणींवर कायदेशीर बंदी घातली होती, मात्र तरीही हा व्यवहार सुरू होता का, याचा तपास पोलीस करत आहेत. स्फोटाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून सखोल चौकशी सुरू आहे.

'परीक्षा पे चर्चा'...

या स्पर्धेतून देशभरातून केवळ ३६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यात महाराष्ट्रातून एकमेव विद्यार्थी म्हणून सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील अजितराव घोरपडे विद्यालय, कळंबी येथील १० वीचा विद्यार्थी प्रणव भोसलेची झालेली निवड आपल्या प्रत्येकाचे हृदय अभिमानाने भरून टाकणारी आहे.

ग्रामीण भागातील शाळेत शिकणारा आपला मुलगा थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधणार... ही संधी केवळ प्रणवसाठीच विशेष नाही, तर यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नाला नवे बळ मिळणार आहे. प्रणवसोबत विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. एन. पाटील यांनाही या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले आहे.

प्रणवचे व त्याला घडवणाऱ्या पालकांचे, शिक्षकांचे आणि त्याच्या विद्यालयाच्या संपूर्ण परिवाराचे मनःपूर्वक अभिनंदन!

राज्यातील ९...

उपमहापौरपदासाठी दिपकसिंह रावत यांची निवड निश्चित झाली आहे.

कोणत्या शहरात कोणाचा महापौर?

– सोलापूरमध्ये महापौरपदी विनायक कोंड्याल (भाजप) यांची निवड झाली असून उपमहापौर निवडीची प्रक्रिया सुरू आहे. जळगावमध्ये दीपमाला काळे (भाजप) महापौर तर मनोज चौधरी (शिवसेना) उपमहापौर, अहिल्यानगरमध्ये ज्योती गाडे (राष्ट्रवादी-एपी) महापौर तर धनंजय जाधव (भाजप) उपमहापौर, नागपूरमध्ये नीता ठाकरे (भाजप) महापौर असून उपमहापौरपदी लीला हाथीबेड यांची निवड झाली आहे. – धुळ्यात मायादेवी परदेशी (भाजप) महापौर आणि ज्योत्स्ना पाटील उपमहापौर, नाशिकमध्ये हीमगौरी आडके (भाजप) महापौर तर विलास शिंदे (शिवसेना) उपमहापौर, छत्रपती संभाजीनगरमध्ये समीर राजूरकर (भाजप) महापौर आणि राजेंद्र जंजाळ (शिवसेना-शिंदे) उपमहापौर पदी निवड झाली आहे. – पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपचे रवी लांडगे, तर उपमहापौरपदी शर्मिला बाबर (भाजप) यांची निवड झाली आहे. कोल्हापुरात रुपाराणी निकम (भाजप) महापौरपदी विराजमान झाल्या आहेत.

मुंबईचा चेहरा उद्या ठरणार

– मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा निकाल लागून पंधरा दिवसांहून अधिक कालावधी उलटला असून आता महापौर आणि उपमहापौर पदासाठीची प्रक्रिया निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे. यंदाचे महापौरपद महिलेसाठी आरक्षित असल्याने मुंबईचा प्रथम नागरिक कोण होणार, याकडे मुंबईकरांचे लक्ष लागले आहे. महापौर आणि उपमहापौर पदासाठी शनिवारी (दि. ७ फेब्रुवारी) नामांकन अर्ज दाखल करण्यात येणार आहेत. – महापालिकेत भाजप आणि शिवसेनेकडे संख्याबळ अधिक असल्याने या दोन्ही पदांवर महायुतीचेच उमेदवार निवडून येण्याची शक्यता आहे. मात्र ही निवडणूक बिनविरोध होऊ न देण्याचा निर्णय उबाठा गटाने घेतल्याने लढत रंगण्याची चिन्हे आहेत. महायुतीतील सत्तासमीकरणानुसार मुंबई महापालिकेत भाजपकडे महापौरपद, तर शिवसेनेकडे उपमहापौरपद दिले जाणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

नवी मुंबईत नाट्यमय घडामोडी

– नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपच्या सुजाता पाटील, तर उपमहापौरपदी दशरथ भगत यांची बिनविरोध निवड झाली आहे. महापौर व उपमहापौर पदासाठी शिवसेना आणि भाजप यांच्यात थेट राजकीय लढत होण्याची शक्यता निर्माण झाली होती. शिवसेनेच्या वतीने दोन्ही पदांसाठी उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केल्यामुळे ही निवडणूक अधिकच चुरशीची ठरणार असल्याचे संकेत मिळाले होते. भाजपकडे स्पष्ट बहुमत असतानाही ही लढत राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली होती. – मात्र निवडणुकीच्या आधीच नाट्यमय घडामोडी घडल्या. शिवसेनेकडून महापौरपदासाठी दाखल करण्यात आलेला नामांकन अर्ज मागे घेण्यात आल्याने भाजपच्या उमेदवार सुजाता पाटील यांची बिनविरोध महापौरपदी निवड झाली. त्यानंतर उपमहापौरपदासाठीही शिवसेनेने नामांकन अर्ज मागे घेतल्यामुळे भाजपचे दशरथ भगत हे बिनविरोध उपमहापौर म्हणून निवडून आले.

सिक्कीममध्ये...

४.५ इतकी नोंदवली गेली. त्यानंतर, गंगटोक जिल्ह्यात दुपारी १:१५ वाजता ३.१ तीव्रतेचे, मंगन जिल्ह्यात दुपारी १:२३ वाजता २.२ तीव्रतेचे, मंगन जिल्ह्यात दुपारी २:०३ वाजता २.५ तीव्रतेचे, नामची जिल्ह्यात दुपारी २:२० वाजता ३.९ तीव्रतेचे आणि नामची जिल्ह्यात दुपारी २:४३ वाजता २.४ तीव्रतेचे भूकंपाचे धक्के जाणवले.

त्याच क्रमाने, मंगन जिल्ह्यात दुपारी २:५६ वाजता २.४ रिश्टर स्केलचा भूकंप, मंगन जिल्ह्यात दुपारी २:५९ वाजता २.५ रिश्टर स्केलचा भूकंप, नामची जिल्ह्यात दुपारी ३:११ वाजता ४.० रिश्टर स्केलचा भूकंप, मंगन जिल्ह्यात दुपारी ३:३६ वाजता २.८ रिश्टर स्केलचा भूकंप, मंगन जिल्ह्यात दुपारी ३:५२ वाजता २.७ रिश्टर स्केलचा भूकंप, मंगन जिल्ह्यात दुपारी ४:५७ वाजता २.२ रिश्टर स्केलचा भूकंप आणि अखेर नामची जिल्ह्यात सायंकाळी ५:२९ वाजता २.९ रिश्टर स्केलचा भूकंप जाणवला.

वांद्रेवरळी सी....

पोहोचवणे कठीण होऊ शकते, अशी चिंता शेलार यांनी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर वांद्रे रेक्लेमेशन परिसरात, सी लिंकजवळ हेलिपॅड उभारण्याची तातडीची गरज असल्याची मागणी शेलार यांनी केली आहे. या हेलिपॅडसाठी आवश्यक जागा उपलब्ध असून यासंदर्भात तातडीने निर्णय घेऊन संबंधित यंत्रणांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश द्यावेत, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. हेलिपॅडची गरज का?

हेलिपॅड उभारण्यात आल्यास कोस्टल रोड व सी लिंकवरील आपत्कालीन परिस्थितीत जखमींना एअर ॲम्बुलन्सद्वारे तातडीने हलवणे शक्य होईल. तसेच लीलावती रुग्णालयासह परिसरातील अन्य प्रमुख रुग्णालयांपर्यंत जलद वैद्यकीय सेवा पोहोचवता येईल. यामुळे आपत्ती व्यवस्थापन, पोलीस, अग्निशमन दल, एनडीआरएफ तसेच अन्य यंत्रणांमधील समन्वय अधिक प्रभावी होऊन मुंबईसारख्या दाट लोकसंख्येच्या आर्थिक राजधानीसाठी दीर्घकालीन आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा अधिक मजबूत होईल, असेही आशिष शेलार यांनी नमूद केले आहे.

लातूर जिल्ह्यात...

स्वतंत्र स्वच्छतागृहांची सुविधा राहणार आहे. मतदान प्रक्रियेसाठी १ हजार ७४७ बॅलेट युनिट आणि १ हजार ७४७ कंट्रोल युनिट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मतदान यंत्रावर जिल्हा परिषद गटाकरिता पांढऱ्या रंगाची तर पंचायत समिती गणाकरिता गुलाबी रंगाची म तपत्रिका असणार आहे.

पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त

जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया शांततामय वातावरणात पार पडावी, या काळात कायदा व सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासनामार्फत चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यासाठी ८ पोलीस उपाधीक्षक, १८ पोलीस निरीक्षक, १२५ सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, १ हजार ९४५ अंमलदार, ३ हजार ८० होमगार्ड, राज्य राखीव पोलीस दलाच्या २ कंपन्या आणि १ प्लॅटून, यासह बाहेर जिल्ह्यातून १ हजार ९४३ होमगार्ड, ५३ अधिकारी, ६३० अंमलदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

१२ पैकी कोणतेही एक ओळखपत्र ग्राह्य; मात्र मतदार यादीत नाव आवश्यक

जिल्हा परिषद, पंचायत समिती मतदानासाठी मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे. मतदार यादीत नाव असेल व निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या बारा ओळखपत्रांपैकी कोणतेही एक ओळखपत्र असेल तर मतदान करता येणार आहे. भारतीय पासपोर्ट, आधार ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना, पॅन कार्ड, केंद्र तथा राज्य शासन किंवा सार्वजनिक उपक्रम यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना दिलेले फोटोसहित ओळखपत्र, बँक किंवा पोस्ट ऑफिसचे फोटो असलेले पासबुक, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला फोटोसहित दिव्यांगत्वाचा दाखला, मनरेगा जॉब कार्ड, निवृत्त कर्मचाऱ्याचे अथवा त्यांच्या विधवा तथा अवलंबीत व्यक्ती यांची फोटो असलेली निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे, लोकसभा अथवा राज्यसभा सचिवालय तसेच विधानसभा अथवा विधानपरिषद सचिवालय यांनी आपल्या सदस्यांना दिलेले अधिकृत ओळखपत्र, स्वातंत्र्य सैनिकांचे फोटो असलेले ओळखपत्र, केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा योजनेचे फोटोसहीत कार्ड या बारा ओळखपत्रांपैकी कोणतेही एक ओळखपत्र मतदानासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

तालुकानिहाय मतदान केंद्र संख्या लातूर- ३००, औसा-२५०, रेणापूर-१३१, चाकूर-१५१, अहमदपूर-२००, उदगीर-२०४, जळकोट-८४, निलंगा-२६८, शिरूर अनंतपाळ- ७६ आणि देवणी-८३.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publ

अपसिंगा येथील स्काऊट आणि गाईड जिल्हा मेळाव्याची पूर्वतयारी पूर्ण



धाराशिव (प्रतिनिधी) धाराशिव भारत स्काऊट गाईड जिल्हा कार्यालय, शिक्षण विभाग व नरेंद्र आर्य विद्यालय अपसिंगा यांच्या संयुक्त विद्यमाने तुळजापूर तालुक्यातील अपसिंगा येथे कब बुलबुल स्काऊट गाईड जिल्हा मेळावा दि.९ ते ११ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यास जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालयातील शेकडो विद्यार्थी एकत्रित येऊन आपापल्या कलागुणांना सर्वांसमोर सादर करतात व यातून एकता साधली जाते. वेगवेगळ्या शाळेतील मुले तीन दिवस तंबूमध्ये निवास करून एकमेकांबरोबर खेळतात, बागडतात व आपल्या कला सादर करतात. तसेच विविध स्पर्धेमध्ये भाग घेऊन मुले आपल्याला व आपल्या शाळेला योग्य ते बक्षीस प्राप्त करून तीन दिवस एकत्रित राहून शेवटच्या दिवशी आपापल्या शाळेकडे रवाना होतात. अशा प्रकारचा हा आनंद मेळावा अपसिंगा येथे होत असून या मेळाव्याची पूर्वतयारी म्हणून जिल्ह्यातील स्काऊट गाईड शिक्षक-शिक्षिका दि.४ ते ११ फेब्रुवारीपर्यंत सदर मेळाव्याची पूर्व तयारी दि.५ फेब्रुवारी रोजी डव्हान्स पार्टी शिक्षक-शिक्षिक यांनी नरेंद्र आर्य विद्यालय अपसिंगा येथे उपस्थित राहून मेळाव्यास येणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय करण्यासाठी वेगवेगळ्या सोयी सवलती निर्माण करून दिल्या. यामध्ये वेगवेगळे गॅजेट्स, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सांडपाण्याची व्यवस्था, शौचालयाची व्यवस्था, निवासाची व्यवस्था आदी गोष्टींची देखभाल करून सर्व पूर्व तयारी पूर्ण केली आहे. डव्हान्स पार्टी धाराशिव भारत स्काऊट गाईड जिल्हा कार्यालयाचे विक्रांत देशपांडे व मेळावा प्रमुख आदर्श शिक्षक दिलीप चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोतदार, कसबे, शेरखाने, मुंडे, वाघमोडे, सविता पांढरे, शुभांगी पाटील, गोरे तसेच जिल्हा कार्यालयाचे सेवक माने यांनी मेळाव्याची पूर्व तयारी पूर्ण केली असल्याची माहिती प्रसिद्धीप्रमुख तथा मराठवाडा शिक्षण संघाचे जिल्हाध्यक्ष जयपाल शेरखाने यांनी दिली आहे.



आमदार निधीतून जिल्हा परिषद शाळांसाठी दहा टक्के निधी राखीव ठेवणार : आमदार राजेश पवार

उमरी (प्रतिनिधी):- स्पर्धेच्या युगात जिल्हा परिषद शाळांकडे लक्ष देण्याची गरज आहे. श्रीमंताच्या मुलांना शहर व जिल्ह्याच्या ठिकाणी खाजगी शाळेत शिक्षण घेता येते. परंतु गरिबांची मुले कोठे शिक्षण घ्यावीत? जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी खूप गुणवत्ता अंगी असलेले, अभ्यासू, जिज्ञासू आणि होतकरू आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे.

यासाठी नायगाव मतदार संघातील सर्व जिल्हा परिषद शाळांना मूलभूत सुविधा, त्यांच्या तंत्रज्ञानाच्या गरजा पूर्ण करण्याची गरज आहे. असे सांगून आमदार निधीतून यापुढे जिल्हा परिषद शाळांसाठी दहा टक्के निधी राखीव ठेवणार असल्याचे प्रतिपादन आमदार राजेश पवार यांनी केले.

उमरी शिक्षण विभाग पंचायत समिती आणि गोदावरी शिक्षण संस्था तळेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने उमरी येथे पहिल्या तालुकास्तरीय नवरंग क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे गुरूवारी उत्साहात उद्घाटन करण्यात आले.

५ ते ७ फेब्रुवारी अशा तीन दिवसीय भरीव महोत्सवाचे उद्घाटन आमदार राजेश पवार यांच्या हस्ते करण्यात आले असून अध्यक्षस्थानी गोदावरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विक्रम देशमुख तळेगावकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार मंजुषा भगत, गटशिक्षणाधिकारी सतीश दर्शनवाड, बापूसाहेब कौडगावकर, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, ज्ञानेश्वर पाटील सावंत, तालुका आरोग्य अधिकारी मोहन देवराये, जेष्ठ पत्रकार नरेंद्र येरावार, पशु वैद्यकीय अधिकारी डॉ.स्वप्नाली ढोक, गजानन माली पाटील, शाहीर जंटल, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी राजू मुधोळकर, शंकर बेळकोणे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. श्री संत ज्ञानेश्वर माऊली संगीत विद्यालयाचे शिक्षक ज्ञानेश्वर गायकवाड यांच्या संचाने स्वागतगीत सादर केले.

राज्यस्तरीय हलगीपटू, कलावंत शिक्षक माधव लिंबूरवाड यांच्या गोळेगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी झांज, लेझीम पथकांनी कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली. आमदार राजेश पवार यांनी प्रोत्साहनासाठी खेळाडूंना नऊ रंगांचा क्रीडा गणवेश दिला आहे. या रंगबिरंगी गणवेशांमुळे उपस्थित विद्यार्थ्यांमुळे महोत्सवात रंगत आणली होती. संपूर्ण कार्यक्रमाला या गणवेशामुळे वेगळा आयाम प्राप्त झाला आहे.

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. त्यांना प्रोत्साहन मिळावे. तालुका, जिल्हा, राज्य व देश पातळीवरील स्पर्धेत सहभागी होता यावे. या दृष्टिकोनातून हा नवरंग महोत्सव आयोजित करण्यात आला.

या क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना भरभरून प्रतिसाद मिळत आहे. याप्रसंगी उमरी तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, सर्व शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, पालक आणि जवळपास दोन हजार विद्यार्थी उपस्थित होते. उमरखेड येथील तरबेज शिक्षक परीक्षक म्हणून कामगिरी बजावत आहेत.

मैदानी खेळात लांब उडी, खो-खो, कबड्डी, उंच उडी, लंगडी, धावणे तसेच इतर प्रकारांत कॅरम, वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा आदी भरगच्च क्रीडा स्पर्धा होतील. यशस्वीतेसाठी पालक प्रबोधन मंच आणि जिल्हा परिषदेचे सर्व शिक्षकवृंद प्रयत्न करीत आहेत.

समारोपाच्या दिवशी सात फेब्रुवारी रोजी आमदार राजेश पवार, पुनमताई पवार यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत या स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम उमरी तालुक्यात पहिल्यांदाच होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत असल्यामुळे पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. प्रास्ताविक सतीश पाटील यांनी केले. सुञसंचालन डी.एम.कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन महेश टिप्रेसवार यांनी केले.

प्रारंभी उपमुख्यमंञी अजीत पवार यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली. पहिल्याच दिवशी क्रीडा महोत्सवास मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

शालेय शिक्षण घेत असताना मीही लेझीम खेळायचो. त्यावेळी पुण्याची आमचीच शाळा स्पर्धेत सातत्याने पहिला नंबर यायची. गटशिक्षणाधिकारी सतीश दर्शनवाड यांनी तळागाळातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा वसा घेतला आहे. यापुढे त्यांच्या प्रत्येक उपक्रमात मी व्यक्तिगत सहभागी होणार आणि मतदारसंघातील शेतकऱ्यांचे लेकरं सशक्त आणि जागतिक नागरिक म्हणून झुंजार बनावेत यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. उमरीच्या पालक प्रबोधन मंचाचा, गुणवत्तेच्या शिक्षकांच्या टीमचा मलाही सदस्य करा. असे आत्मियतेने सांगत आमदार राजेश पवार यांनी गटशिक्षणाधिकाऱ्यांचे तोंडभरून कौतुक केले. पुढील काळात एक भव्यदिव्य असे क्रीडा व सांस्कृतिक संकूल उभारण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. असे भक्कम आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

महावितरणचा 'शॉक'; चार एकर ऊस खाक

लातूर : औसा तालुक्यातील शिवणी (बु.) येथील शिवसांब गणपतराव संगरे यांचा ४ एकर ऊस शॉर्टसर्किटने सोमवारी दुपारी जळून खाक झाला. यात शेतकऱ्याचे जवळपास सहा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

शेतकरी शिवसांब सगरे यांनी सांगितले, शिवणी (बु.) शिवारात गट नंबर ८१ यांच्या शेतातून महावितरणच्या मुख्य वीज वाहिन्या जातात. या तारा इतक्या जुन्या आणि सैल झाल्या आहेत, त्यापासून धोका आहे. सोमवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास वारा सुटला आणि या सैल झालेल्या विजेच्या तारांचे एकमेकांना घर्षण झाले. त्यातून उडालेल्या ठिणग्यांनी उन्हाच्या तीव्रतेमुळे वाळलेल्या पाचोळ्याला क्षणात कवेत घेतले. पाहता... पाहता आगीने रौद्ररूप धारण केले आणि हातातोंडाशी आलेला चार एकरावरील ऊस आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. शेतकरी सगरे यांनी संताप व्यक्त करताना सांगितले की, या धोकादायक तारा दुरुस्त करण्यासाठी महावितरणकडे वारंवार तोंडी विनंत्या केल्या होत्या. मात्र, महावितरण प्रशासनाला याची साधी दखल घ्यावी वाटली नाही. जर प्रशासनाने वेळीच दखल घेतली असती, तर आज झालेले नुकसान टळले असते. महावितरणच्या या आडमुठ्या धोरणामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संतापाची लाट आहे. महसूल, महावितरण अन् पोलिसांनी केला पंचनामा....

औसा तालुक्यातील शिवणी (बु.) शिवारातील घटनास्थळी महसूल विभाग, महावितरण कर्मचारी आणि औसा पोलिसांनी भेट देऊन जळालेल्या उसाचा, नुकसानीचा गुरुवारी दुपारी पंचनामा केला आहे.

बॉल बॅडमिंटन चे विद्यापीठीय प्रशिक्षण सुरू



देगलूर (प्रतिनिधी): येथील वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयाच्या वतीने बॉल बॅडमिंटन मुलीच्या विद्यापीठीय प्रशिक्षणार्थींना तीन छखड प्रशिक्षकांचे मार्गदर्शन व प्रात्यक्षिक लाभले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व वै. धुंडा महाराज महाविद्यालय देगलूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर विद्यापीठीय बॉल बॅडमिंटन मुलींच्या संघाचे प्रशिक्षण शिबिर २-२-२०२६ ते ९-०२-२०२६ दरम्यान प्रशिक्षण शिबिर देगलूर महाविद्यालय देगलूरच्या मैदानावर चालू आहे.

संबंधित प्रशिक्षणार्थी संघाला विविध महाविद्यालयातील एन. आय. एस. प्रशिक्षक संघाला क्रीडा संचालक प्रा. डॉ. विक्रम कुंटूरवार (शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर) यांनी इम्पॉर्टन्स ऑफ मोटर क्वालिटी आवरणेस अँड बॉल बॅडमिंटन स्किल, क्रीडा संचालक डॉ. मनोज पैंजणे (यशवंत महाविद्यालय नांदेड), रोल ऑफ फ्लेक्झिबिलिटी बॉल बॅडमिंटन स्किल अँड टेक्निक्स, क्रीडा संचालक प्रा. डॉ. आश्विन बोरीकर(सायन्स कॉलेज नांदेड), हाऊ टू ऍक्युरसी टॉवर अँड स्पिन सर्विस इन बॉल बॅडमिंटन या विषयावर व्याख्यान दिले व प्रात्यक्षिक करून दाखविले व कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. डॉ. भडके (वै. धुंडामहाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर) सरांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. नीरज उपलंचवार (देगलूर महाविद्यालय देगलूर) यांनी केले. सर्व मान्यवरांनी प्रशिक्षणार्थी खेळाडूंना आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

छावा संघटनेच्यावतीने स्व जावळे यांना अभिवादन



परंडा (प्रतिनिधी) अखिल भारतीय छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष स्व. आण्णासाहेब जावळे पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस छावा संघटनेच्यावतीने परंडा नगर परिषदेचे नगराध्यक्ष जाकीर भाई सौदागर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.

यावेळी मराठवाडा संपर्क प्रमुख अमर शेख यांनी आपले मनोगत व्यक्त करताना कै आण्णासाहेब यांच्या सोबत असतानाच्या आठवनीना उजाळा दिला.

आण्णासाहेब यांनी सामाजिक कार्य करत असताना स्वतःच्या जीवाची सुद्धा पर्वा केली नाही. तसेच मराठा आरक्षणासाठी आपल्या प्राणाची बाजी त्यांनी लावल्याचे सांगितले. या कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्ष आकाश जेधे, तालुका उपाध्यक्ष रामराजे काकडे, शहराध्यक्ष हरिभाऊ आदमीले, संतोष वारे, ढगपिंपरीचे रमेश गरड, बापूसाहेब हावळे, महादेव इतापे, पाचपिंपळ्याचे गोपीनाथ खैरे, विकास चव्हाण, संभाजी खैरे, पिंपरखेडचे नागनाथ थोरात, विद्यार्थी आघाडीचे सुलतान शेख, सुर्यराज खंडागळे, संस्कार गरड, नण्या पवार, समर्थ गोफणे, गणेश नलावडे, शिराळ्याचे धनंजय वाघमोडे, खासगाव चे सीताराम सातपुते, सुनील सातपुते, लोहारा माजी सरपंच विकास बैरागी आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थी शिष्यवृत्ती अर्जाचा तातडीने निपटारा करा

धाराशिव (प्रतिनिधी) इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत तगछढ, जइउ व डइउ प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार शिष्यवृत्ती, निशुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, राजर्षी शाहू महाराज गुणवंत शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता आदी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या सर्व योजनांसाठी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यार्थ्यांनी तात्काळ अर्ज भरून http://mahadbtmahit.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १४ जानेवारी २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

सन २०२५-२६ साठी बहुतांश विद्यार्थ्यांनी महाडीबीटी प्रणालीवर शिष्यवृत्ती अर्ज भरलेले असून, ते अर्ज सध्या महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत. मात्र संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी अद्यापपर्यंत या अर्जाची पडताळणी करून ते सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाकडे सादर केलेले नाहीत, अशी बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सन २०२५-२६ साठी आपल्या महाविद्यालयाच्या लॉगिनवर प्रलंबित असलेले VJNT, OBC व SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्तीचे पात्र अर्ज तात्काळ मंजुरीसाठी या कार्यालयाकडे सादर करावेत.

अर्ज सादर करताना शाळा सोडल्याचा दाखला (Transfer Certificate - T.C.) व गुणपत्रक हे मूळ (Original) असणे आवश्यक असून, याबाबत विशेष करावेत. प्रत्येक दक्षता घ्यावी. तसेच ज्या अर्जामध्ये त्रुटी असतील, असे अर्ज त्रुटी पूर्तता करूनच मंजुरीसाठी सादर महाविद्यालयाच्या लॉगिनवर एकही अर्ज प्रलंबित राहणार नाही, याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांनी घ्यावी. तसेच ज्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत शिष्यवृत्ती अर्ज भरलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावरून अर्ज भरण्याबाबत सूचित करण्यात यावे, असे यापूर्वीही आवाहन करण्यात आले होते.

तथापि, आजच्या स्थितीत जिल्ह्यात आर्थिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये एकूण २,३५६ शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. ही बाब गंभीर असून, महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले सर्व अर्ज दिनांक १४ जानेवारी २०२६ अखेर निकाली काढण्यात यावेत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. जर सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील महा डीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीसाठी नोंदणीकृत झालेला कोणताही विद्यार्थी लाभापासून वंचित राहिला, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयातील प्राचार्यांची राहील, सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांनी कळविले.

एअरटेल टॉवरमधील प्लेट्स चोरणारी आंतरराज्य टोळी गजाआड

तामलवाडी पोलिसांची धडाकेबाज कारवाई



तामलवाडी, - तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील एअरटेल कंपनीच्या मोबाईल टॉवरवरील साडेतीन लाख रुपये किमतीची मडीएलए कार्डफप्लेट चोरणाऱ्या सराईत गुन्हेगाराला तामलवाडी पोलिसांनी अटक केली आहे. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथील हा आरोपी असून, त्याने मराठवाड्यात अशाच प्रकारचे पाच गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

सात जानेवारी रोजी तामलवाडी येथील टॉवरवरून अज्ञात चोरट्यांनी महागड्या प्लेट्स लंपास केल्या होत्या. या प्रकरणाचा तांत्रिक तपास करताना धक्कादायक माहिती समोर आली. मुख्य आरोपी ध्रुव त्रिभुवन प्रसाद (वय २५, रा. प्रयागराज, उत्तरप्रदेश) आणि त्याचा अन्य एक साथीदार बनावट आधार कार्ड व लायसन्स वापरून शहरातून भाड्याने कार घेत असत. दिवसा टॉवरची रेकी करून रात्रीच्या वेळी हे तांत्रिक साहित्य चोरून पसार व्हायचे.

आरोपी पुन्हा चोरीच्या उद्देशाने महाराष्ट्रात येणार असल्याची माहिती मिळताच, सपोनि गोकुळ ठाकूर यांच्या पथकाने तांत्रिक पुराव्यांच्या आधारे सापळा रचला. वैराग-गौडगाव मार्गे बेंबळी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देवळाली शिवारात आरोपी येत असताना पोलिसांनी आरोपीला रंगेहाथ पकडले. त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली चारचाकी आणि साहित्य जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोकर, अप्पर पोलीस अधीक्षक शफाकत आमना आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गोकुळ ठाकूर, पीएसआय प्रदीप टेकाळे व त्यांच्या टीमने यशस्वीरीत्या पूर्ण केली.

एक कप चहाची किंमत सहा लाख !


लातूर : होय लातूर शहरात राहणाऱ्या एका तरूणास एक कप चहा तब्बल सहा लाख रूपयाला पडला आहे. बँकेत जमा करण्यासाठी हा तरूण डिक्कीत सहा लाख रूपये ठेऊन निघाला. वाटेत एका हॉटेल समोर ॲक्सेस गाडी लावून निघाला, वाटते एका हॉटेल समोर ॲक्सेस गाडी लावून चहा पिण्यात मग्न असताना चोरट्याने सहा लाख रूपयांसह ॲक्सेस पठविली.

असगर हुसेन मिरासी रा. गिरवलकर नगर लातूर हा तरूण ५ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास ॲक्सेस १२५ एम. एच. २४-बीके - ९०४७ च्या डिक्कीमध्ये सहा लाख रूपये ठेऊन एचडीएफसी बँकेत जमा करण्यासाठी जात होता. वाटेत धुमाळ टी स्टॉल पाहून त्याने दुचाकी हॉटेल समोर लावून चहा पिण्यात व्यस्त असताना चोरट्याने ती ॲक्सेसच पळविली. डिक्कीतील सहा लाख रूपये काढून घेऊन दुचाकी एका गल्लीत सोडून चोरटे पसार झाले. या प्रकरणी लातूरच्या शिवाजीनगर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धाराशिवमधे कॅन्सर जनजागृतीसाठी साडी वॉकॅथॉनचे आयोजन

धाराशिव (प्रतिनिधी)- शहरात दि.८ फेब्रुवारी रोजी साडी वाकेथॉनचे आयोजन करण्यात आले. धाराशिव शहरातील तुळजाभवानी स्टेडियममध्ये ५.४५ वाजता कॅन्सर जनजागृतीसाठी साडी वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे.

ओस्ला ओयॉसीस लेडीज फाउंडेशन, धारासुरमर्दिनी महिला फेडरेशन, आय एम ए डॉक्टर वुमन्स विंग, अक्षरवेल महिला साहित्य मंडळ, रोटरी क्लब ऑफ धाराशिव, निमा वुमन्स फोरम यांच्यावतीने द रियल इस्टेट मॉल प्रस्तुत साडी वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. वॉकेथॉनचा मार्ग तुळजाभवानी स्टेडियम मार्गे आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पोलीस मुख्यालय मार्गावरुन बसवेश्वर चौक ते फुलाई मल्टीस्टेटच्या



समोरुन यू टर्न घेऊन वापस तुळजाभवानी स्टेडियम येथे पार पडणार आहे. याच कार्यक्रमात कॅन्सर जनजागृती मार्गदर्शन करण्यासाठी पुणे येथील एन्कॉलॉजिस्ट डॉ. श्रुती गांधी येणार असून त्या कॅन्सरबद्दल सर्व महिलांना मार्गदर्शन करणार आहेत. तसेच या कार्यक्रमांमध्ये विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ. माया जगदीश पाटील, पुर्वी अभय गजेंद्रगडकर, प्रतिभा श्रीकांत देशमुख, स्नेहा बर्डे, प्रगती कोळगे या कर्तृत्ववान महिलांना धाराशिव नारीशक्तीने सन्मानित करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त महिलांच्या मनोरंजनासाठी महिलांसाठी योगा झुंबाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच कार्यक्रमानंतर पूर्ण परिवारासाठी फुड फेस्टीव्हलचे ही आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे धाराशिवमधील जास्तीत जास्त महिलांना सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

खेळामुळे संघ भावना विकसित होते : डॉ.बाबासाहेब ठोंबरे

कृषि महाविद्यालयात हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन संपन्न

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : कृषि महाविद्यालय, लातूर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून प्रतिवर्षाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या कला व क्रिडा गुणांना वाव मिळावा या हेतूने क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे मा.कुलगुरू इंद्र मणि व संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ. भगवान आसेवार यांच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार करण्यात येते. यावर्षी क्रिडा स्पर्धा दि:०३/०२/२०२६ ते दि:०९/०२/२०२६ या दरम्यान आयोजित करण्यात आले आहेत यामध्ये आज दि:०६/०२/२०२६ रोजी हॉलीबॉल स्पर्धेचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून कृषि महाविद्यालय, लातूरचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे, उद्घाटक म्हणून श्रीमंत बडगीर तर प्रमुख अथिती म्हणून शिवाजी गिरी, कुणाल गुंगार्डे, डॉ. व्यंकट जगताप, जिमखाना



उपाध्यक्षा डॉ.ज्योती देशमुख, डॉ. विजय भामरे व डॉ.राजेश शेळके हे उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोपात डॉ.बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की खेळाडूंनी कायमच पंचाच्या निर्णयांच्या आदर करावा तसेच खेळातून राष्ट्रीय एकतेची कल्पना प्रत्यक्षात येवून देशप्रेमाची भावना जोपासली जाते. ते पुढे असेही म्हणाले की, खेळामुळे संघ भावना विकसित होते तर हार, जीत हा कुठल्याही खेळाचा अविभाज्य भाग असून हार व जीत झाली तरी परस्परांबद्दल नेहमी आदरभाव ठेवून विद्यार्थ्यांनी खिलाडुवृत्ती जोपासावी.

उद्घाटक श्रीमंत बडगीर म्हणाले की विद्यार्थीनींनी खेळ हे जिंकण्यासाठी नव्हे तर सहभागासाठी सुद्धा खेळले पाहिजेत त्यातूनच तुमचा संपूर्ण विकास होवून उद्याचे सशक्त व तंदुरुस्त नागरिक तयार होवू शकतात. यावेळी कुणाल घुंगार्डे यांनी खेळाडूंना जीवनात अभ्यासाबरोबर खेळास प्राधान्य देण्याचे आवाहन केले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन संपन्न झाले. तसेच या क्रिडा सप्ताह अंतर्गत क्रिकेटच्या स्पर्धा दि. ३ ते ५ फेब्रुवारी दरम्यान रोजी पार पडल्या यात मुलांमध्ये चौथ्या वर्षाच्या व मुलींमध्ये तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थिनींनी विजेतेपद मिळविले तर प्रथम वर्ष पदव्युत्तरचे विद्यार्थी व चौथ्या वर्षाच्या विद्यार्थिनींचा संघ उपविजेता ठरला. रस्सीखेच स्पर्धेमध्ये मुलांमध्ये तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी विजेतेपद व पदव्युत्तर द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी उपविजेते पद मिळविले. विद्यार्थिनींमध्ये चौथ्या वर्षाचे विद्यार्थ्यांनी विजेतेपद तर तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थिनींनी उपविजेतेपद संपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.राजेश शेळके यांनी केले. यावेळी डॉ.अनंत शिंदे, डॉ. दयानंद मोरे, डॉ.ज्ञानेश्वर सुरडकर, डॉ. सचिन पडवळ , नामदेव खटिंग यांनी सहकार्य केले. विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्या बहुसंख्य उपस्थितीने क्रिडा स्पर्धांचे उद्घाटन पार पडले.



दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीचा इन्क्रिटी टेक्नॉलॉजिज कंपनीशी सामंजस्य करार

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : दयानंद एज्युकेशन सोसायटी संचलित दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, लातूर आणि पुणे येथील नामांकित इन्क्रिटी टेक्नॉलॉजिज (इन्क्यूब फार्मा प्रायव्हेट लिमिटेड) या कंपनीमध्ये नुकताच सामंजस्य करार (एम.ओ.यू.) करण्यात आला. या करारामुळे फार्मसी विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण, संशोधन व करिअर संधींचे नवे दालन खुले होणार आहे.

या सामंजस्य करारांतर्गत विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण, संशोधन उपक्रम, मेडिकल कोडिंग, फार्माकोव्हिजिलन्स तसेच रेग्युलेटरी अफेअर्ससारखे व्यावसायिक व रोजगाराभिमुख कोर्सेस राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन मिळून भविष्यातील नोकरीच्या संधींसाठी भक्कम व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

करारप्रसंगी इन्क्रिटी टेक्नॉलॉजिजकडून शार्दूल भोसले (हेड सी.एस.आर. अँड कॉलेज कोलॅबोरेशन) आणि आतिष जाधव (हेड प्लेसमेंट अँड कॉर्पोरेट कोलॅबोरेशन) हे प्रतिनिधी उपस्थित होते. दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी प्रा. प्रतीक चिंचोले व प्रा. ओम पाटील तसेच शिक्षण संस्थेचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. अनिल बिरादार यांनी या करारासाठी विशेष पुढाकार घेतला. इन्क्यूब फार्मा ही कंपनी सौंदर्य प्रसाधने, बेसिक केमिकल्स तसेच फार्मास्युटिकल फॉर्म्युलेशन्सच्या निर्मिती क्षेत्रात कार्यरत असून, उद्योग व शिक्षण यांतील दरी कमी करण्यासाठी विविध उपक्रम राबवित आहे.

या सामंजस्य करारावद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा तसेच सर्व विभागप्रमुख व प्राध्यापकवृंद यांनी संस्थेचे अभिनंदन करून समाधान व्यक्त केले.

वन्यजीव प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीचे अनुदान द्यावे- नानाजी खाकरे

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वन्यजीव प्राण्यांच्या उपद्रवांमुळे मोठे आर्थिक नुकसान होत असून त्याचा फटका सर्वसामान्य शेतकऱ्यांना बसत आहे. याची भरपाई म्हणून सरकारने आर्थिक स्वरूपात मदत करावी अशी मागणी भारतीय किसान संघाचे अखिल भारती जैवीक शेती प्रमुख नानाजी आखरे यांनी आयोजीत पत्रकार परिषदेत केली. यावेळी महाराष्ट्र प्रांत संघटन मंत्री चंदन पाटील, जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले, जिल्हा मंत्री सतीश देशपांडे तावशीकर आदिंची उपस्थिती होती.



भारतीय किसान संघाच्या वतीने लातूर येथील संघ कार्यालयातील जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बैठक आयोजीत करण्यात आली होती. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना शेतीमालाला उत्पादन आधारीत खर्चावर दीडपट अधिक भाव मिळाला पाहिजे अशी किसान संघाची मागणी आहे. भारतीय किसान संघही देशभर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संघर्ष करणारी पक्षविरहीत संघटना आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संस्थापक अध्यक्ष दत्तोपंत ठेंगडी ४ मार्च १९७९ रोजी या संघटनेची स्थापना केली. महाराष्ट्रातील ७० हजार गावांतून ग्रामसमिती नेमली असून त्या समितीमार्फत शेतकऱ्यांना जैवीक शेतीसाठीचे मोफत प्रशिक्षण दिले जात आहे. संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविला जातो. शेतकरी एकजुटीसाठी देशभर प्रयत्नशील असलेल्या या संघटनेने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सरकारने एफआरपीनुसार भाव जाहीर करण्या संदर्भात प्रस्ताव दिला होता. त्यानुसार सरकारने एफआरपी दिली असली तरी प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांच्या पदरात काहीही पडत नाही. शासनाने हमीभाव केंद्रे जरी उभारली असली तरी ही खरेदी केंद्रे उशिरा सुरू होत असल्याने व शेतकऱ्यांना मजबुरीने बाजारात माल विकावा लागतो त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. या नुकसानीची भरपाई म्हणून भावांतर योजनेअंतर्गत मदत द्यावी जेणेकरून सकारला खरेदी केंद्रासाठी लागणारे मनुष्यबळ व इतर खर्च करावा लागणार नाही. यासाठी आम्ही महाराष्ट्र सरकारकडे भावांतर फरकाचा प्रस्ताव दिला आहे तो अंमलात आणावा, असेही खाकरे यांनी यावेळी नमुद केले. विविध प्रश्नांवर आयोजीत बैठकीत लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रमुख तीन मागण्या समोर आलेल्या आहेत. त्याच्या पूर्ततेसाठी आम्ही जिल्हा प्रशासनाकडे जिल्हाध्यक्षांमार्फत निवेदन देऊन मागणी करणार आहोत. ही मागणी वेळेत पूर्ण न झाल्यास येत्या २४ मार्च रोजी आंदोलन करण्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला.

लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वन्यजीव प्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. या नुकसानीपासून बचाव करण्यासाठी कुंपन योजना सुरू केली असली तरी त्याची तरतूद अत्यल्प आहे. या वन्यजीव प्राण्यांचा सरकारनेच बंदोबस्त करावा अथवा शेतीला कुंपन करण्यासाठी योग्य ती मदत शेतकऱ्यांना करावी. तसेच येणाऱ्या काळात शेतकऱ्यांचा हरभरा हा बाजारात येणार असून त्यासाठी खरेदी केंद्रे तात्काळ सुरू करावीत, जेणेकरून शेतकऱ्यांच्या हातात योग्य मोबदला मिळेल. शासकीय यंत्रणा व त्यात बसलेले अधिकारी हे जाणीवपूर्वक उशिरा खरेदी केंद्र सुरू करतात त्यामुळे नाविलाजास्तव शेतकऱ्यांना कमी भावात माल विकावा लागतो. तसेच शेतकऱ्यांच्या पाणंद रस्त्यांचा विषयही लवकरात सरकारने सोडवावा. आदी वरील तीन मागण्या या लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या महत्वपूर्ण असून याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा भारतीय संघाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी प्रांताध्यक्ष नवनाथ मद्दे, जिल्हामंत्री सतीश देशपांडे तावशीकर तर कोषाध्यक्ष शेखर मराठे, प्रसिद्धीप्रमुख संजय देशपांडे आदिंची उपस्थिती होती.

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीमुळे मद्यविक्री राहणार बंद

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर, दि. ०६ : लातूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १० पंचायत समित्यांची सार्वत्रिक निवडणूक २०२६ कार्यक्रमानुसार ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान व ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. ही निवडणूक खुल्या, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५ (सी) अंतर्गत तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार मतदानापूर्वीचा संपूर्ण दिवस म्हणजे ६ फेब्रुवारी २०२६, मतदानाचा संपूर्ण दिवस म्हणजे ७ फेब्रुवारी २०२६ रोजी महानगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत क्षेत्र वगळून संपूर्ण लातूर जिल्हा अबकारी अनुज्ञप्त्या (मद्य दुकाने) बंद राहतील.

याशिवाय, मतमोजणीच्या दिवशी म्हणजे ९ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे, लातूर जिल्ह्यातील मतमोजणीचे ठिकाणी मद्यविक्री अनुज्ञप्त्याही बंद राहतील. एफएल-२, एफएलबीआर-२, एफएल-३, एफएल-४, एफएलबीआर-११ तसेच ताडी अनुज्ञप्ती इत्यादी सर्व प्रकारच्या मद्यविक्री अनुज्ञप्त्या या कालावधीत बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी महाराष्ट्र मद्य निषेध कायदा १९४९ व महाराष्ट्र विदेशी मद्य नियम, १९६९ मधील तरतुदीनुसार निर्गमित केले आहेत.

निवडणूक पथकांकडून वाहनांची तपासणी

शिरूर अनंतपाळ,- होऊ घातलेल्या दोन जिल्हा परिषद गट व चार पंचायत समिती गणांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात तीन ठिकाणी स्थायी निगराणी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. येरोळ मोड, साकोळ, आरी मोड येथे पथकांकडून वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. त्यांच्यावर करडी नजर ठेवली जात आहे. आरी मोड येथे ये-जा करणाऱ्या वाहनांद्वारे कोणतेही अनुचित प्रकार घडू नयेत, आचारसंहितेचा भंग होऊ नये, यासाठी आरी मोड येथील निलंगा - नळेगाव रोड येथे स्थायी निगराणी पथक कार्यरत करण्यात आले आहे. या पथकात पथक प्रमुख एस. जी. सारगे, शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे कर्मचारी सुभाष आडे, व्हिडीओ ग्राफर अभिजीत धुळे कार्यरत आहेत. निवडणुका शांततेत, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पडाव्यात, यासाठी प्रशासनाकडून काटेकोर उपाययोजना राबवण्यात येत आहेत.

इयत्ता दहावी, बारावी परीक्षा केंद्रांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर, दि. ६ : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता बारावी) १० फेब्रुवारी, २०२६ ते ११ मार्च, २०२६ या कालावधीत १५२ परीक्षा केंद्रावर व माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता दहावी) २० फेब्रुवारी, २०२६ ते दि. १८ मार्च, २०२६ या कालावधीत २५२ परीक्षा केंद्रावर पार पाडली जाणार आहे. या सर्व परीक्षा केंद्रांच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर व परिसरात गर्दीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये या परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामुळे परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी परिक्षार्थी एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करण्यात येणार नाही. १०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपींग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील.

परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असेल. कोणत्याही व्यक्तीकडून परीक्षा सुरळीतपणे शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करण्यात येणार नाही. परीक्षा केंद्रावर कोणत्याही व्यक्तीस अथवा वाहनास प्रवेश मनाई राहील. हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी परीक्षार्थी केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी व पोलीस अधिकारी,कर्मचारी यांच्याबाबत त्यांच्या परीक्षासंबंधी कर्तव्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने लागू राहणार नाहीत. १० फेब्रुवारी,२०२६ ते १८ मार्च,२०२६ या कालावधीमध्ये सकाळी ९ ते दुपारी ६ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील.

लातूर येथे श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांचा ७४० वा पुण्यतिथी महोत्सव उत्साहात साजरा





दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : येथील श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांचा ७४० वा पुण्यतिथी महोत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळी महाराजांच्या मूर्तीला अभिषेक व महापूजा समाज बांधव श्री व सौ. कुमार अडाणे यांच्या यजमानपदाखाली पार पडली. त्यानंतर सकाळी ११ वाजता सराफ लाईन येथून भव्य मिरवणुकीचा शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व नगरसेवक गणेश गवारे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.यावेळी मान्यवरांचा समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.व ही मिरवणूक राजेश बागडे यांच्या दुकानासमोर स्वागत कार्यक्रमात माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

दुपारी किर्तन, त्यानंतर गुलाल व दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी मंदिर प्रभागाच्या नगरसेविका सौ. अदितीताई कव्हेकर तसेच ऋषिकेश राजे यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर महाप्रसादास सुरुवात करण्यात आली असून सुमारे ३००० ते ३२०० भाविक व समाज बांधवांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष श्री. राजाभाऊ बोकन, पुण्यतिथी महोत्सव समितीचे कुमार अडाणे,नितीन बागडे,अजय भुमकर,रमेश अडाणे,शैलेश टेहरे,सुनील वाडकर,गजेंद्र बोकन,बंडू शहाणे,सचिन अडाणे,सुजित बोकन,विलास भुमकर,अजय बोकन,गजानन उडानशीव,चंद्रकांतराव मुंडलिक,ओंकार डहाळे तसेच सर्व समाज बांधवांनी विशेष परिश्रम घेतले.



दयानंद विज्ञानमध्ये 'हिंद की चादर' गीत व माहितीपटाचे सादरीकरण

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०५ फेब्रुवारी २०२६ रोजी हिंदी विभागाच्या वतीने सर्तीदर सरताज यांचे हिंद की चादर या गीताचे व माहितीपटाचे सादरीकरण प्रोजेक्टरच्या माध्यमातून करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार व महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या सूचनेनुसार शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दी वर्षानिमित्त गीताचे तसेच माहितीपटाचे आयोजन करण्यात आलेले होते.या माध्यमातून गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य, मानवी मूल्ये व अन्यायाविरुद्ध दिलेल्या महान बलिदानाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने यांनी या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता, सामाजिक ऐक्य व राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करणे आहे असे सांगितले,तर माहितीपट सादरीकरणानंतर डॉ.शेटकार रामशेट्टी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या जीवनकार्यावर चर्चा करून त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.विद्यार्थ्यांनी या गीताबद्दल व माहितीपटाबद्दल उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिल्या.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये तेगबहादूर साहिबजी यांच्या कार्याची प्रेरणा व नैतिक मूल्यांची जोपासना झाली.या कार्यक्रमासाठी मानसी गायकवाड, सुनील राक्षे, बालाजी यमपुरे,शंकर भालके यांचेही सहकार्य लाभले.